जाहिरात छोटी
संधी मोठी
संपर्क करा
8850541939
9821004969

साप्ताहिक
RNI No. MAHMAR/2011/39072

# युवा सह्याद्री

मुख्य संपादक: अरुण आत्माराम माळी
वृत्तपत्र नव्हे, चळवळ

मुंबई | वर्ष : १६ | अंक : ०४ | बुधवार दिनांक : ११ फेब्रुवारी २०२६ ते १७ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ : ८ | कार्यकारी संपादक : विवेक मोरे | मूल्य : २ ₹

## सरकारी कृपेपासून संशयापर्यंत ; मोदी काळात गोमांस निर्यात रँक ९ ते २ आणि शंकराचार्य अविमुक्तेश्वर यांच्यावर पदवीचा आरोप ?



देशाच्या राजकीय-धार्मिक मैदानात आता एक 'धर्म आणि सत्ता' यांचा तीव्र संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे. आधी अनेक सरकारी कार्यक्रमांत सन्मानाने आमंत्रित केले जाणारे आणि सत्ताधाऱ्यांकडून आदर मिळणारे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी गोमांस निर्यातीबाबत सरकारवर आक्रमक टीका आरंबली आणि त्यानंतरच त्यांच्या शंकराचार्य पदवीच्या वैधतेवर प्रश्न उभे राहिले आहेत. यावर देशात मोठा वाद निर्माण झाला आहे. अयशस्वी सरकार का विरोधात बोलणाऱ्याचा बहाणा? विरोधकांचा आरोप आहे की, जे प्रधानमंत्री स्वतःच्या पदवीची सत्यता लपवत आहेत, तेच धार्मिक पदवीवर शंका उपस्थित करून दबाव घालत आहेत. हे हुकूमशाही नव्हे का?

मोदी सरकारच्या काळात गोमांस निर्यात, विरोधकांचा आरोप आणि तथ्य राजकीय वादाला आणखी उग्र रूप देणारा एक मुद्दा म्हणजे गोमांस निर्यात वाढचा. जे मोदी सरकारच्या काळात भारताने जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले, अशी डेटा आधारित चर्चा विरोधकां कडून केली जाते. अभ्यासक आणि काही मीडिया अहवालांनुसार, २०१८ मध्ये भारताच्या गोमांस निर्यातीत सुधारणा झाल्या आणि देश दुसऱ्या सर्वात मोठ्या गोमांस निर्यातीमध्ये पुढे आला, तर पूर्वी हा क्रम ३ वा किंवा त्यापुढील होता.

या वाढीवर काँग्रेससह विरोधकांनी मोदी सरकारवर तीव्र टीका केली आहे, की सत्ताधारक गोमांस निर्यातीला आर्थिक प्रोत्साहन देत आहेत, आणि GST सह शून्य कर धोरणामुळे निर्यात अधिक फळले आहे — हे पारदर्शक नाही, असे आरोप त्यांनी केले आहेत.

विरोधकांचे मत आहे की, एकीकडे गोमातेसंबंधी धार्मिक भावना उठवून राजकीय ढकलाट करणे, तर दुसरीकडे देशाला गोमांस निर्यातीमध्ये जागतिक अग्रस्थान मिळवून देणे — हे दोहोंचा विरोधाभास दर्शवते.

धर्म, सत्ता आणि नीतिमत्ता यांचा तुटलेला समतोल

शंकराचार्य अविमुक्तेश्वरांच्या गोमांस निर्यातीबाबतच्या टीकेनंतर त्यांच्या पदवीवर प्रश्न उपस्थित करणे — हे धर्मनिर्णयावर राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे. विरोधक म्हणतात, "जर स्वतःच्या नेतृत्वाच्या शैक्षणिक पात्रतेवर पारदर्शकता नाही, तर इतरांबद्दल प्रश्न कसे?"

या वादामुळे धर्मगुरूंच्या भूमिकेवर चर्चा नव्हे, तर राजकारण आणि शासनावर प्रश्नचिन्ह उभे झाल्याचे चित्र देशभर पसरले आहे. शेवटी प्रश्न असा उरतो: धर्म आणि राजकारणाची सीमा ओलांडली जात आहे का? आणि सरकारची भूमिका सार्वजनिक हितात आहे की राजकीय संरक्षणात? या प्रश्नांची उत्तरे पुढील घडामोडींमध्ये स्पष्ट होतील.

दरम्यान अखंड हिंदुस्थान मधून शंकराचार्यजी अविमुक्तेश्वर सरस्वती यांना हिंदूंचे प्रचंड समर्थन मिळत असून वर्तमान आरएसएस प्रणित भाजप सरकारच्या विरोधात हिंदूंच्या मनात संतप्त भावना प्रकट होताना दिसत आहेत.

## मुंब्रा-कौसामध्ये गिरवले जातायत 'मराठीचे धडे'; मरझिया पठाण यांचा स्तुत्य उपक्रम!

दहावीच्या (SSC) परीक्षेच्या तोंडावर, मुंब्रा-कौसा सारख्या भागात विद्यार्थ्यांनी केवळ पास न होता मराठी विषयातही उत्तम गुण मिळवावेत, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) विद्यार्थी नेत्या मरझिया शानू पठाण यांनी एक विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'दहावी (SSC) महा-मार्गदर्शन शिबिरात' विद्यार्थ्यांना चक्क 'मराठी



भाषेचे धडे' देण्यात आले.मुंब्रा आणि कौसा परिसरात उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. अनेकदा या विद्यार्थ्यांना मराठी विषयाची भीती वाटते किंवा हा विषय कठीण जातो. हीच अडचण ओळखून मरझिया पठाण यांनी या महा-मार्गदर्शन शिबिरात मराठी विषयावर विशेष भर दिला. "राज्याची भाषा ही आलीच पाहिजे आणि त्यात मुंब्राच्या विद्यार्थ्यांनी मागे राहू नये," या उद्देशाने तज्ज्ञ शिक्षकांमार्फत मुलांना सोप्या भाषेत मराठी व्याकरण आणि लेखन कौशल्याचे धडे देण्यात आले.



संपादक -
अरुण आत्माराम माळी
मो. 9821004969

## संपादकीय

### "मोफत उपचारांवर सावट; आरोग्य हा हक्क की सरकारी दया?"

महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार बंद होणार असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि काही तासांतच लाखो नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली. नंतर सरकारने "गैरसमज" असल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आणि निर्णय मागे घेतल्यासारखी भूमिका मांडली. मात्र प्रश्न फक्त एका परिपत्रकाचा नाही, प्रश्न आहे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेवरील विश्वासाचा. सरकारी रुग्णालय म्हणजे गरीब, कष्टकरी आणि मध्यमवर्गीयांचा शेवटचा आधार. खासगी रुग्णालयांच्या वाढत्या बिलांमुळे सामान्य माणूस आधीच कर्जबाजारी होत आहे. अशा परिस्थितीत "मोफत उपचार" ही केवळ योजना नाही, तर जगण्याची हमी आहे. त्यामुळे मोफत सेवांवर गदा येणार अशी चर्चा देखील लोकांच्या असुरक्षिततेत भर घालणारी ठरते.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे प्रशासनातील हलगर्जीपणा. आरोग्यासारख्या अत्यंत संवेदनशील क्षेत्रात जुने दरपत्रक "चुकून" जोडले जाते आणि नंतर दुरुस्ती काढली जाते, ही बाब साधी चूक म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. धोरण जाहीर करण्यापूर्वी पडताळणीची मजबूत यंत्रणा आहे का? की निर्णय आधी आणि विचार नंतर असा कारभार सुरू आहे?सरकार वारंवार "राइट टू हेल्थ"ची भाषा करते, पण आरोग्य हा खरोखर हक्क मानला जातो का? जर तो हक्क असेल, तर मोफत आणि सुलभ उपचारांबाबत कोणतीही संदिग्धता राहता कामा नये. कारण आरोग्य सेवा महाग झाली तर त्याची किंमत केवळ पैशात मोजली जाणार नाही, ती मोजली जाईल गमावलेल्या जीवांमध्ये.याहून मोठा प्रश्न म्हणजे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची क्षमता. सरकारी रुग्णालयांमध्ये आधीच डॉक्टरांची कमतरता, अपुरी साधनसामग्री आणि प्रचंड रुग्णभार आहे. शुल्क आकारण्याचा विचार करण्यापेक्षा या यंत्रणेला सक्षम करण्यावर भर देणे अधिक गरजेचे नाही का? आरोग्यावरचा खर्च हा तिजोरीवरील भार नसून समाजाच्या भविष्यातील गुंतवणूक आहे, हे सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. सरकारने या प्रकरणातून धडा घेण्याची वेळ आली आहे.

पारदर्शकता, स्पष्ट संवाद आणि लोकांच्या विश्वासाला धक्का न लावणारी धोरणे, हीच खरी गरज आहे. अन्यथा "गैरसमज" हा शब्द पुढे ढाल बनू शकतो, पण लोकांचा विश्वास परत मिळवणे कठीण होईल.शेवटी एक गोष्ट निर्विवाद, आरोग्य सेवा ही कृपा नाही, ती राज्याची जबाबदारी आहे. आणि जे राज्य आपल्या नागरिकांच्या आरोग्याबाबत अनिश्चितता निर्माण करते, ते विकासाच्या दाव्यांवर कितीही बोलले तरी त्या दाव्यांची पायाभरणी कमकुवतच राहते.



प्रतिनिधी (दिपक साबळे) : घणसोली मध्ये संध्याकाळी ७ ते ९ पर्यंत मरीआई चौक ते दत्तनगर या विभागातील सर्विस रोड दुपारी मुलांच्या शाळेच्या दरम्यान शाळा भरणे आणि सुटणे या वेळी वाहतुकीमुळे चालण्यासाठी खूप अडचणी निर्माण झाल्या आहेत. एका व्यक्तीला चालणेही मुस्किलीचे होत असून, अनेक महिलांना चालणे अडचणी होत असून अनेक वाहन चालक मध्येच अडवणूक करत असल्याने भांडणाचे प्रकार वाढत आहेत. मोठी समस्या किंवा दुर्घटना होण्या अगोदर या काही प्रमाणात तोडगा काढणे, या रोड वरील चालणे व वाहतूक सुरळीत सुरू करण्याची मागणी दत्तनगर मधील नागरिकांची मागणी आहे. तरी स्थानिक पालिका प्रशासनाने या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन वाहतूक सुरळीत करावी अशी युवा सह्याद्री वृत्तपत्राच्या माध्यमातून देखील आवाहन करण्यात येत आहे.

# गोवंडी येथे मराठी तरूणाला मारहाण व जातीवाचक शिवीगाळ प्रकरणात रहेजा बिल्डरला अटक होणार

गोवंडी, मुंबई (डॉ.भालचंद्र कासले):मुंबईत मराठी तरूणाला मारहाण व जातीवाचक शिवीगाळ प्रकरणात, रहेजा बिल्डरला अटक होणार आहे. 'तुम जय भीम वाले लोग कभी सुधरेगा नहीं' असे वक्तव्य करणाऱ्या व मराठी तरुणाला मारहाण करणाऱ्या मुंबईतील रहेजा बिल्डरला आता अटक होणार आहे. मुंबईत बिल्डर सुशील रहेजांच्या ऑफीसची तोडफोड करण्यात आली आहे. मुंबईतील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून तोडफोड करण्यात आली आहे. मुंबईतील एका मराठी तरुणाला जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करत, सुशील रहेजांना अटक करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

मुंबईतील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सुशील रहेजाचा अरेरावीपणा समोर आला आहे. एका मराठी तरूणाला मारहाण करत त्याने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा गंभीर आरोप मुंबईतील गोवंडी येथील एका तरूणाकडून करण्यात आला आहे. रहेजा बिल्डरने तुम घाटी, जय भीम वाले लोग कभी सुधरोगे नही असे म्हणत एका मराठी तरूणाला मारहाण केली असल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात सुशील रहेजाविरोधात गोवंडी पोलीस स्टेशनमध्ये मराठी तरूणाला मारहाण आणि जातीवाचक शिवीगाळ प्रकरणात ऍट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणानंतर मुंबईत पुन्हा एकदा मराठी अमराठीचा वाद वाढलेला दिसत आहे.



काही दिवसांपूर्वी मुंबईतील सुशील रहेजा बिल्डरने त्याच्याकडे कामास असलेल्या राहुल जाधव यास बेदम मारहाण केली होती व जातीवाचक शिवीगाळ केली होती. आणि ऑफिसमध्ये सर्व स्टाफसमोर त्याला मारहाण केली होती. यावरून मुंबईत वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले आहे. रहेजा बिल्डर विरोधात मुंबईतील गोवंडी पोलीस स्टेशनमध्ये अट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीसुद्धा आरोपी रहेजा बिल्डरला पोलिसांनी अटक केली नाही. यांवरून गोवंडी परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला होता.

सुशील रहेजा त्याच्या चेंबूर येथील ऑफिसमध्ये असल्याचे समजल्यावर, मुंबईतील वंचित बहुजन आघाडी महिला आघाडीच्या मुंबई प्रदेशाध्यक्षा स्नेहल सोहनी, वंचित बहुजन युवा आघाडीचे सागर गवई यांनी रहेजा बिल्डरच्या ऑफिसमध्ये गेले होते, तो रहेजा बिल्डर तिथून पळून गेला आहे. या घटनेनंतर नंतर वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सुशील रहेजाचे ऑफिस फोडले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीने रहेजा बिल्डरला अटक करण्याची मागणी केली आहे.

पीडित तरुण राहुल जाधव हा बिल्डर सुशील रहेजाकडे कामाला आहे. मारहाण व शिवीगाळ झालेल्या या घटनेच्या दिवशी पीडित तरुण राहुल जाधवने कागदपत्रे नीट स्टेपल न केल्याचा राग मनात धरून रहेजा बिल्डर यांनी राहुलला मारहाण केली होती. व तुम घाटी, जय भीम वाले लोग कभी सुधरेगा नही असे वादग्रस्त वक्तव्य केले होते आणि जातीवाचक शब्द वापरून मराठी तरूणाचा अपमान केला, व बिल्डरने स्टाफ समोरच मारहाण केली होती. यावरून वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. याप्रकरणात आता गोवंडी पोलिसांकडून चेंबुरमधील सुशील रहेजा बिल्डरला अटक होणार आहे. याप्रकरणात अधिक तपास गोवंडी पोलिस करत आहे.

# आता रस्त्यावर गाडी चालवायला भरावा लागणार 'टॅक्स', महापालिकेत नवा प्रस्ताव

मुंबई: आता वाहतूक कोंडीच्या क्षेत्रात गाडी घेऊन गेल्यावर मुंबईकरांना कर भरावा लागण्याची शक्यता आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी एक नवा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. लंडन आणि सिंगापूरसारखी एक नवी करप्रणाली सुरू करण्याचा प्रस्ताव भाजपचे नगरसवेक मकरंद नारवेकर यांनी मांडला आहे.

**काय आहे 'कनजेश्चन टॅक्स'?**

महापालिका आयुक्त भूषण गगरानी




यांना मकरंद नारवेकर यासंदर्भात नुकतच एक पत्र लिहिलं. या पत्रात त्यांनी खासगी वाहनं वाढत्या वाहतूक कोंडीचं कारण असल्याचा सांगितलं. दक्षिण मुंबईतील सर्वाधिक कोंडीच्या भागांमध्ये खासगी वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडी आणि गर्दी वाढते. त्यामुळे अशा ठिकाणांवर 'कनजेशन टॅक्स' लावला पाहिजे असे त्या पत्रात नमूद केले.

कशी असेल प्रक्रिया?

ही करप्रणाली दक्षिण मुंबईत सुरू करण्याची मागणी केली आहे. या भागातील कोंडीच्या मार्गावर सकाळी 8 ते 11 आणि पुन्हा सायंकाळी 5 ते 8 दरम्यान खासगी वाहनांवर दंड आकारला जाणार आहे. यावेळी वाहनांची सीसीटीव्हीच्या मदतीने 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन' ओळख पटवण्यात येईल. अशा वाहनचालकांना 50 ते 100 रुपयांचा दंड भरावा लागू शकतो. हा दंड वाहनचालकांच्या FASTagमधून कापला जावा असे त्यांनी सांगितले. याद्वारे दरवर्षी तब्बल 200 ते 300 कोटींचा दंड वसूल होऊ शकतो. हा कर मुंबईतील प्रदूषण कमी करण्यात मदत करेल.

## लाडकी बहीण योजनेची मोठी बातमी, e-KYC संदर्भात 'हा' निर्णय

तुम्ही 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचे केवासी केले नसेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. याचसंदर्भात ही मोठी बातमी आहे. लाडकी बहीण योजनेत ज्या महिलांनी e-KYC केले नाही, किंवा त्यांचे काही कारणांनी ईकेवासी राहिले आहे, अशी महिलांनी ही बातमी संपूर्ण वाचा.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत 31 डिसेंबर 2025 पर्यंत अनेक महिलांनी e-KYC पूर्ण केले. मात्र, कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा (Pension) पर्याय निवडताना अनेक लाभार्थ्यांकडून चुकीची माहिती भरली गेली. असे अनेक प्रकरणं समोर आले. यामुळे पात्र असूनही अनेक महिलांचे अर्ज अपात्रतेच्या धोक्यात आले होते. आता याचसंदर्भात ही मोठी बातमी आहे. मंत्री आदिती तटकरे




यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ई केवायसी दुरुस्तीची संधी 31 मार्चपर्यंत असल्याचं म्हटलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : 31 मार्च पर्यंत e-KYC दुरुस्तीची संधी!e-KYC प्रक्रिया करताना काही लाभार्थ्यांकडून चुकीचा पर्याय निवडला आहे.यामुळे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः ज्या पात्र लाभार्थ्यांनी e-KYC करूनही त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळालेला नाही, अशा सर्व बहिणींना आपली e-KYC माहिती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत 31 डिसेंबर 2025 पर्यंत ईकेवासी होऊ न शकलेल्यांसाठी आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत e-KYC मध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## मराठी शाळा वाचवण्यासाठी कालवार ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक निर्णय; जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या पालकांची १००% घरपट्टी माफ!

भिवंडी प्रतिनिधी:सध्याच्या काळात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रस्थ आणि मराठी शाळांची कमी होणारी पटसंख्या यावर उपाय म्हणून भिवंडी तालुक्यातील कालवार ग्रामपंचायतीने एक अत्यंत धाडसी आणि कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. गावात जिल्हा परिषद शाळेत आपल्या मुलांचा प्रवेश घेणाऱ्या पालकांसाठी चक्क १०० टक्के घरपट्टी माफीची घोषणा ग्रामपंचायतीने केली आहे.कालवार ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. महेश बाळाराम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, १ जून २०२६ पासून जे पालक आपल्या पाल्याचा प्रवेश 'जिल्हा परिषद शाळा, कालवार' मध्ये घेतील, त्या पालकांना ग्रामपंचायतीकडून आकारली जाणारी घरपट्टी १०० टक्के माफ करण्यात येणार आहे.गावातील मुलांनी आपल्या हक्काच्या मराठी शाळेत, म्हणजेच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे आणि मराठी शाळांचे अस्तित्व टिकावे, या उदात्त हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, हा महाराष्ट्रातील एक पथदर्शी प्रकल्प ठरू शकतो.या उपक्रमासाठी सरपंच श्री. महेश म्हात्रे यांच्यासह, उपसरपंच सौ. संगिता कल्पेश पाटील आणि ग्रामपंचायत अधिकारी श्री. निलेश सुरेश म्हात्रे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी विशेष पुढाकार घेतला आहे.

# प्रचंड रेटारेटीत दररोज जीवघेणा प्रवास, कल्याण-कर्जत मार्गावर नव्या प्रकल्पांचा फक्त गाजावाजा; ठाणेकरांना दिलासा कधी?

मुंबई : महामुंबईतील महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाणारे ठाणे आता मुंबई उपनगरी रेल्वेवरील प्रवासी मृत्यूंचे केंद्र ठरू लागले आहे. गेल्या चार वर्षांपासून मुंबई उपनगरी रेल्वेवर सर्वाधिक मृत्यू ठाणे रेल्वे स्थानक परिसरातच नोंदवले आहेत. अपुऱ्या लोकलफेऱ्या, लोकलना होणारा विलंब त्यामुळे प्रवाशांचा लटकून होणारा जीवघेणा प्रवास, वर्षानुवर्षे रखडलेल्या प्रकल्पांमुळे सर्वसामान्यांची गैरसोय यांमुळे गर्दीसह आता मृत्यूचे 'ठाणे' अशी शहराची ओळख होऊ लागली आहे.

**कशामुळे लोकलला विलंब?**

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण/कसारा/कर्जत या मुख्य मार्गांवरील लोकल सातत्याने विलंबाने धावत आहेत. एसी लोकलच्या अयोग्य नियोजनामुळे मुख्य मार्गावरील वेळापत्रकाचा बोजवारा उडाला आहे. विलंबाने येणाऱ्या लोकलमध्ये प्रवाशांची तुडुंब गर्दी होते. अनेकदा ऐनवेळी लोकल निश्चित फलाटाऐवजी अन्य फलाटावर येते. त्यामुळे प्रवासी लोकल पकडण्यासाठी जीव धोक्यात घालून रुळांवर उड्या घेत फलाट ओलांडतात.

ठाणे स्थानकावरील सर्वाधिक अपघात रेल्वे रुळ ओलांडणे आणि धावत्या लोकलमधून पडूनझाले आहेत. सन २०२५मध्ये रुळ




ओलांडताना १२५ पुरुष आणि १९ महिलांचा मृत्यू झाला. धावत्या लोकलमधून पडून ६० पुरुष आणि सहा महिलांनी जीव गमावला. विशेष म्हणजे, सन २०२२ ते २०२५ दरम्यान सर्वाधिक मृत्यूंची नोंद होत असतानाही ठोस उपाययोजना राबवण्यात यंत्रणा सपशेल अपयशी ठरली. स्थानकातील चोरवाटा बंद करणे, रुळ ओलांडण्यासाठी उपाययोजना करणे, लोकल वेळेत चालवणे याबाबत रेल्वे पोलिसांकडून रेल्वे सुरक्षा दल आणि मध्य रेल्वेला पत्रव्यवहार करण्यात आला आहे, असे रेल्वे पोलिसांचे म्हणणे आहे.

## आता पावसाळ्यात रुळांवर पाणी भरणार नाही, ठाणे स्थानकावर अत्याधुनिक प्रकल्प; कर्जत, पनवेलसह सर्व प्रवाशांना फायदा

मुंबई: मुंबई उपनगरी रेल्वेवरील महत्त्वाच्या ठाणे स्थानक परिसरातील पाणी साचून रेल्वे वाहतूक ठप्प होण्याच्या समस्येवर आता कायमस्वरूपी तोडगा मिळाला आहे. मध्य रेल्वेने ( Central Railway ) ठाणे स्थानकात मायक्रोटनेलिंगचे काम पूर्ण केले आहे. महामुंबईतील हे सर्वाधिक लांबीचे मायक्रोटनेल आहे. विशेष म्हणजे मायक्रोटनेल कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात आली असून एक बटण दाबताच पाण्याचा उपसा करणे शक्य होणार आहे.

ठाणे शहराच्यापश्चिमेकडून पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात फलाट क्रमांक एक, दोन आणि तीनवर साचते. रेल्वे मार्ग पाण्याखाली गेल्याने सीएसएमटीसह कल्याण दिशेकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतूकीवर परिणाम होतो. पश्चिमेकडून येणाऱ्या पाण्याचा निचरा पूर्वेकडे वेगाने होण्यासाठी फलाट क्रमांक एक ते फलाट क्रमांक दहाच्या रुळांखालून मायक्रोटनेल उभारण्याचा निर्णय मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने घेतला.




आगामी पावसाळ्यात लोकल (Mumbai Local) अबाधित राहून प्रवाशांच्या प्रवासात अडथळा येऊ नये, यासाठी पावसाळी पूर्वतयारीचा भाग म्हणून ठाणे स्थानकात मायक्रोटनेल उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. उच्च अचूकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी एमबीटीएम (मायक्रोटनेल बोरिंग मशिन) अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करण्यात येत आहे. यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा वेगाने होऊन लोकलसेवा अखंडित राहण्यास मदत मिळणार आहे, असे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

**ट्रेंचलेस मायक्रोटनेलिंगचा वापर-** ठाणे रेल्वे स्थानकातील १० फलाटांवरून मध्य रेल्वेचा मुख्य मार्ग, ट्रान्सहार्बरसह मेल-एक्स्प्रेसगाड्यांची हाताळणी होते. यामुळे ठाणे रेल्वे स्थानकात प्रवासी आणि रेल्वेगाड्यांची वर्दळ सातत्याने असते. रुळांवर उतरून काम करणे शक्य नव्हते. यामुळे प्रवासी वाहतुकीला बाधा न आणता हे काम रिमोट कंट्रोलद्वारे चालविण्यात येणाऱ्या बोरिंग मशिनच्या सहाय्याने केले जाते. ही पूर्णपणे ट्रेंचलेस (खोदकाम न करता) बांधकाम पद्धत आहे.

## मुंब्रा प्रभाग समितीत एमआयएमचा आक्रमक पवित्रा; अधिकाऱ्यांना 'जुनी सिस्टीम चालणार नाही' असा इशारा

भास्कर ब्युरो/ठाणेठाणे : मुंब्रा शहरात एमआयएमचे पाच नगरसेवक निवडून आल्यानंतर स्थानिक राजकारणात हालचालींना वेग आला आहे. मुंब्रा हा आमदार जितेंद्र आव्हाड यांचा बालेकिल्ला मानला जात असताना एमआयएमच्या यशामुळे समीकरणे बदलली आहेत. मुंब्रा प्रभाग समितीत झालेल्या पहिल्याच बैठकीत एमआयएमच्या नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा देत आक्रमक भूमिका मांडली.मुंब्रा प्रभाग समितीतील पाणीपुरवठा विभागाची बैठक एमआयएमच्या नगरसेवकांसाठी नियोजित असल्याचा अधिकृत संदेश देण्यात आला होता. त्यानुसार सर्व नगरसेवक उपस्थित राहिले असता, तेथे इतर पक्षांचे नगरसेवकही बसलेले दिसून आले. यावर एमआयएमचे नगरसेवक सैफ पठाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "पुढील वेळी बैठक घेताना एमआयएमचे पाच नगरसेवक निवडून आले आहेत, हे विसरू नका. बैठकीची संपूर्ण माहिती आमच्या गटाला मिळाली पाहिजे," असा ठाम सवाल त्यांनी उपस्थित केला.यावेळी नगरसेविका सहर शेख यांनीही अधिकाऱ्यांना खडसावले. "मुंब्र्यात आता जुनी सिस्टीम चालणार नाही. वेळ बदलला आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता ठाम निर्णय घ्या," असे त्या म्हणाल्या. विकासकामे पारदर्शकपणे राबवण्यासाठी समन्वय आवश्यक असून अधिकारी आणि नगरसेवकांनी एकत्रितपणे काम केल्यासच बदल शक्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.एमआयएमच्या नगरसेवकांनी पुढील पाच वर्षांसाठी जनतेने आपल्यावर विश्वास टाकल्याचे सांगत प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवणे ही आपली प्राथमिक जबाबदारी असल्याचे ठामपणे मांडले.

# मुंबईत भर दिवसा गोळीबाराचा थरार, 19 वर्षीय तरुणीचा मृत्यू, महाराष्ट्राची राजधानी हादरली

मुंबई : महाराष्ट्राची राजधानी आज गोळीबाराच्या घटनेने हादरली आहे. मुंबईत गोवंडी येथे शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत भर दिवसा गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेत एका 19 वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर हल्ला करणारी व्यक्ती पळून गेली आहे. तर दुसरीकडे घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास सुरु केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. मुंबई सारख्या मोठ्या शहरात अशा प्रकारची गोळीबाराची घटना घडल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. पण मुंबईत गोळीबाराच्या घटना सातत्याने समोर येत आहे. नुकतंच काही दिवसांपूर्वी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबाराची घटना याआधी घडली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांचीदेखील




गोळीबार करुन हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली होती. पण आज शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत झालेली घटना ही वेगळी असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतशिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास तरुणीवर गोळीबार करण्यात आला. पूर्ववैमनस्यातून ही गोळीबाराची घटना घडल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर येत आहे. वैयक्तिक वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत. या घटनेची सध्या परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा सुरु आहे.

**तरुणीवर गोळी कुणी झाडली? मोठी माहिती समोर**

मृतक तरुणीवर त्याच परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गोळी झाडून ठार केल्याची माहिती आहे. ही तरुणी आपल्या पतीसोबत जवळीक करीत असल्याचा महिलेला संशय होता. त्यातून दोन दिवसांपूर्वी दोघींमध्ये जोरदार भांडण झाले होते. त्याचाच राग काढण्यासाठी हे कृत्य केल्याचे म्हटले जात आहे. गोळीबार करणारी महिला फरारअसून पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती आहे.

# ठाण्यात जणगणनेला होणार सुरवात २०११ मध्ये झाले होती जणनगणना

ठाणे : ठाणे महानगरपालिका हद्दीत येत्या मे महिन्यात पहिल्या टप्प्यात जणगणना सुरु होणार आहे. जनगणनेचा पहिला टप्प्यात शहरातील घरे, इमारती आणि कुटुंबांची सविस्तर मोजणी करण्यात येणार आहे. त्यानुसार यासाठी प्रभाग समिती निहाय प्रगणक गट तयार करण्यात येणार आहेत. त्यांच्या माध्यमातून ही मोजणी केली जाणार आहे. तर दुसरा टप्यात जून अखेर पर्यंत पूर्ण होईल अशी माहिती महापालिकेने दिली आहे.२०११ च्या जनगणनेनुसार ठाणे शहराची लोकसंख्या सुमारे १८.४ लाख इतकी होती. त्यानंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर झालेल्या नागरीकरणामुळे व लोकसंख्या वाढीमुळे यंदाची जनगणना अधिक व्यापक आणि महत्त्वाची ठरणार आहे. जनगणनेसाठी ठाणे मनपा क्षेत्रात एकूण ५,७०० प्रगणकांची नियुक्ती करण्यात येणार असून, प्रत्येक सहा प्रगणकांमागे एक पर्यवेक्षक नेमण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवले जाणार आहे.या जनगणनेपूर्वी महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांकडे उपलब्ध असलेला जन्म-मृत्यू, कुटुंब नोंदणी व इतर लोकसंख्याविषयक डेटा संकलित करून त्याची छाननी केली जात आहे. आरोग्य केंद्राकडे लसीकरण व इतर माध्यमातून घरी जाणे होत असल्याने तोच डेटा हाती घेतला जाणार आहे. यामुळे प्रत्यक्ष सर्वेक्षण अधिक अचूक होण्यास मदत होणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.जणगणनेचे दोन टप्पे तयार करण्यात आले आहेत. यात पहिला टप्पा हा १ मे ते १५ मे २०२६ असा असणार आहे. यातून घर यादी तयार केली जाणार आहे. प्रत्येक प्रगणकाला १८० ते २०० घरांची मोजणी करावी लागणार आहे. म्हणजेच घर गणना पहिल्या टप्प्यात केली जाणार आहे.दुसरा टप्पा हा १६ मे ते १५ जून २०२६ असा असणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नागरिकांची वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक माहिती संकलित केली जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डिजिटल पद्धतीने पार पाडली जाणार असून, नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार जणगणना पूर्ण झालयवर त्याचा संदर्भ १ मार्च २०२७ असा असणार आहे. जनगणनेसाठी महापालिकेच्या माध्यमातून तयारी करण्यात आलेली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात घर मोजणी केली जाणार आहे. यासाठी प्रगणकांची निवड केली जाणार आहे. प्रत्येक सहा प्रगणकांच्या मागे एक पर्यवेक्षक नेमला जाणार आहे.

# डोंबिवलीच्या सोहमचा लोकलमधून पडून बळी, वडील ZP मतदानासाठी गावी, आई-भावापासून संध्याकाळपर्यंत लपवलेलं

डोंबिवली : विज्ञान शाखेचा पहिला पेपर देण्यासाठी जात असलेल्या बारावीच्या विद्यार्थ्याचा मंगळवारी प्रचंड गर्दीमुळे लोकलमधून पडून मृत्यू झाला. कळवा–मुंब्रादरम्यानच्या धोकादायक वळणावर सकाळी १०.१५ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. रेल्वे प्रवासी संघटनांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**दीड वर्षांपूर्वी डोंबिवलीत शिफ्ट-** सोहम कटरे (१८) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. डोंबिवली पूर्वेकडील आजदे परिसरात 'सीता कुंज-१' या इमारतीत तो आई-वडील आणि भावासोबत राहत होता. हे कुटुंब दीड वर्षांपूर्वी कळवा येथून डोंबिवलीत स्थलांतरित झाले होते. सोहम कळवा येथील परीक्षा केंद्रावर जात असताना काळाने त्याच्यावर झडप घातली.

सोहमचे वडील सचिन कटरे हे इस्टेट एजंट असून, त्याची आई कुटुंबाच्या खर्चाला हातभार लावण्यासाठी एका दुकानात काम करते. ही दुर्घटना घडली तेव्हा सचिन हे जिल्हा परिषद निवडणुकीच्या मतदानासाठी गावी गेले होते. मुलाच्या मृत्यूची बातमी कळताच त्यांनी तातडीने कळवा रुग्णालय गाठले. या दुर्घटनेबाबत सोहमची आई आणि भावाला संध्याकाळी उशिरापर्यंत माहिती देण्यात आली नव्हती.

**विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र डब्याची मागणी-**सोहमच्या मृत्यूनंतर 'रेल्वे अजून किती बळी घेणार', असा संतप्त प्रश्न रेल्वे प्रवासी संघटनांनी उपस्थित केला. या




घटनेविरोधात आज, बुधवारी ठाणे रेल्वे स्थानक परिसरात काळ्या फिती लावून रेल्वेच्या निष्काळजीचा निषेध करण्यात येणार आहे. यात प्रवाशांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन या संघटनांनी केले आहे. तसेच, गर्दीच्या प्रवासाची सवय नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र डब्याची व्यवस्था करण्याची मागणीही या निमित्ताने करण्यात येत आहे.

# मुलांची हृदये कमकुवत का होत आहेत?

पूर्वी चाळिशी ओलांडलेल्यांना हार्ट ॲटॅकचा धोका होता पण आता लहान मुलेही याच्या तावडीत सापडत आहेत. असे काय आहे जे आपण समजू शकत नाही. या चिंताजनक स्थितीकडे लक्ष द्यायला हवे.

दोन मोठी कारणे : आजकालच्या खाण्या-पिण्यात पोषणाचा अभाव असून जादा चरबीयुक्त व तळकट तेलकट पदार्थांचे सेवन आणि अत्याधिक जंक फूड मुलांच्या आरोग्यावर दुष्परिणाम करीत आहे. याशिवाय शारीरिक हालचालीचा अभाव हेही एक मोठे कारण आहे.

मुलांचे बहुतेक काळ स्क्रीनसमोर बसणे त्यांची शारीरिक सक्रियता घटवत आहे. स्थूलता वाढवत आहे आणि याचा सरळ परिणाम त्यांच्या हृदयावर होत आहे. स्थूलता, उच्च रक्तदाब आणि मधुमेहासारख्या समस्या हळू हळू मुलांमध्ये वाढत आहेत. ज्या पुढे हृदयाच्या आजारांना जन्म देऊ शकतात.

कमकुवत हृदयाची हीसुद्धा कारणे : मुलांमध्ये हार्टॲटॅकमागे अनेक कारक असू शकतात. ज्यापैकी काही जन्मजात व काही जीवनशैलीसंबंधित आहेत.

**हायपरट्रॉफिक कार्डियोमायोपॅथी :** यामध्ये हृदयाचे स्नायू असामञ्जनय रुपात मोठे होतात ज्यामुळे हृदयाची स्पंदने वेगवान होऊ शकतात आणि कार्डियक अरेस्टचा धोका वाढतो. ही आनुवांशिक समस्या असू शकते.

* चॅनलोपॅथी : शरीरात इलेक्ट्रोलाइट्स म्हणजेच सोडियम व पोटॅशियम संतुलित करणाऱ्या चॅनल्समध्ये गडबड झाल्यामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात. यामुळे हृदय खूप वेगात वा खूप सावकाश धडकू शकते. ज्यामुळे प्राणघातक स्थिती उत्पन्न होऊ शकते.

**धमण्यांमध्ये अडथळा :** हार्ट ॲटॅक हृदयाच्या धमण्यांमध्ये अडथळ्यामुळे होतो. प्रौढांमध्ये हे सामान्यतः कोलेस्ट्रॉल साचल्यामुळे होते पण मुलांमध्ये हे धमण्यांच्या विकासात ही समस्या रोखायला हवी

मुलांच्या आहारात ताजी फळे, ताज्या भाज्या, फायबरयुक्त जेवण आणि प्रोटीनचे प्रमाण वाढवावे. मुलांना जंक फूड, कोल्ड ड्रिंक्स, जादा खारट वा गोड खाद्यपदार्थ देऊ नयेत. बाजारू चीज, पनीर, मेयोनीजही पूर्णपणे टाळावे.

मुलांना खेळण्यासाठी, धावण्याच्या व्यायामासाठी प्रेरित करायला हवे. रोज किमान एक तासाची शारीरिक क्रिया हृदय सुदृढ राखण्यास मदत करते.

जर कुटुंबात एखाद्याला हृदयासंबंधित आजार राहिला असेल तर मुलांची वरचेवर कार्डियोलॉजिस्टकडून चेक अप करवायला हवी. आजकालच्या स्पर्धेने भरलेल्या जगात मुले तणावात राहात असतात. ज्यामुळे त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य प्रभावित होत असते. योग आणि ध्यानसारख्या क्रियांमध्ये मुलांना सामील करा.

मुलांना अभ्यासाचा ताण देऊ नका. जर मूल खेळताना लवक थकत असेल, छातीत दुखण्याची तक्रार करीत असेल, त्याला वारंवार चक्कर येत असेल, श्वस घेण्यास त्रास होत असेल वा त्वचेचा रंग निळा होत असेल तर त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

**असामान्यत्वामुळे होऊ शकते.**

* **जन्मजात हृदयदोष :** काही मुलांच्या हृदयात जन्मतः छेत असतो वा त्याच्या रक्तवाहिन्या असामान्य रुपात विकसित होतात. ज्यामुळे भविष्यात हृदयाची गंभीर समस्या होऊ शकते.

**एएलसीएपीए सिंड्रोम :** हृदयाच्या मुख्य धमणी एओर्टाएंवजी पल्मोनरी आर्टरीतून निघते, जी हार्ट ॲटॅकचे कारण बनते.

**संक्रामक रोग वा सूज :** काही संक्रमण व ऑटोइम्यून रोग हृदयाच्या स्नायूंमध्ये सूज आणू शकतात. ज्याला मायोकार्डिटिस म्हणतात. हे हृदय कमकुवत करू शकतात व गंभीर परिणाम होऊ शकतो.

आर्टरीत सूज : काही मुलांमध्ये आनुवांशिक कारणांमुळे हृदयाच्या धमण्यांमध्ये सूज असू शकते. ज्यामुळे



रक्तप्रवाह प्रभावित होतो. ही समस्या तरुण व मुलांमध्ये दुर्लल असते पण पूर्णपणे नाकारता येऊ शकत नाही.

**कावासाकी रोग :** यामध्ये धमण्यांमध्ये सूज आणि अडथळे होऊ शकतात. जे हार्टॲटॅकचे कारण बनू शकते.

मुलांमध्ये व प्रौढांमध्ये होणाऱ्या हार्टॲटॅकची कारणे वेगवेगळी असतात आणि त्यांच्या उपचाराच्या योजनाही वेगवेगळ्या असतात. सुरक्षेसाठी सामान्य उपाय दोहोंचे सारखेच असतात.

**मेटाबॉलिजमही आहे कारण :** आजकाल मुलांची शारीरिक सक्रियता खूप कमी आहे आणि त्यांच्या आहारात कॅलरी वाढल्या आहेत. याचा परिणाम सरळ त्यांच्या मेटाबॉलिज्मवर होत आहे. जेव्हा शरीरात जास्त चरबी पोहोचते तेव्हा ती हळू हळू धमण्यांमध्ये साचू लागते आणि रक्तप्रवाहात अडथळा आणू शकते. यामुळे कोलेस्ट्रॉल वाढू शकते. उच्च रक्तदाब असू शकते आणि मधुमेहासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

**मेटाबॉलिक टेस्ट केव्हा करवणे आवश्यक :** जर मुलाचे वजन गरजेपेक्षा जास्त वाढत असेल तर ते लवकर दमतात. खेळात वा धावण्या-पळण्यात भाग घेत नाही. वेगाने चालायचे असेल तर त्याला दम लागतो वा वारंवार आजारी पडतो. अशावेळी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. लिपिड प्रोफाइल, रक्तदाब, शुगर पातळी व इतर मेटाबॉलिक टेस्ट करवून हे ठरवता येते की, मूल एखाद्या गंभीर स्थितीकडे जात तर नाही ना.

# वाढणाऱ्या कोलेस्ट्रॉलचा हृदयाला धोका

कितीतरी लोकांना आपल्या शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली आहे किंवा वाढते आहे याचा सुगावा लागत नाही. परिणामी, अनेक वेळा शिरा पूर्णपणे बंद होई पर्यंत कोलेस्ट्रॉलची पातळी वाढत जाते आणि त्यानंतर ब्लॉकेजेस, हार्ट अटॅकचा धोका वाढतो.

बदलत्या काळानुसार प्रत्येकाची जीवनशैली बदलत चालली आहे. मात्र, बदलणारी जीवनशैली आरोग्यासाठी हानिकारक सिद्ध होत आहे. कामाचा नि कौटुंबिक गोष्टींचा वाढणारा ताण आणि त्यात चुकीच्या सवयी आरोग्याची वाट लावण्यासाठी पुरेशा आहेत.

हृदय विकार, स्ट्रोक, श्वसन विकार, मानसिक अस्थैर्य, लठ्ठपणा अशा अनेक समस्यांनी आज बरेच लोक त्रासलेले आहेत. यातील कितीतरी समस्यांचे कारण वाढते कोलेस्ट्रॉल आहे. केवळ लठ्ठ नव्हे तर शरीरयष्टीने बारीक असणाऱ्या लोकात सुद्धा वाढते कोलेस्ट्रॉलची समस्या निर्माण होत आहे. कितीतरी लोकांना आपल्या शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली आहे किंवा वाढते आहे याचा सुगावा लागत नाही.

परिणामी, अनेक वेळा शिरा पूर्णपणे बंद होई पर्यंत कोलेस्ट्रॉलची पातळी वाढत जाते आणि त्यानंतर ब्लॉकेजेस, हार्ट अटॅकचा धोका वाढतो. अशा वाढत्या कोलेस्ट्रॉलची काही लक्षणे असतात, ती जाणून घेऊया.


स्नायू मध्ये वेदना होणे : अनेकदा अचानक हात, पाय दुखण्याची समस्या जाणवते. कित्येकदा असह्य वेदना होतात. ज्यांचे कारण माहित नसते. तर याचे कारण उच्च कोलेस्ट्रॉल असू शकते. जेव्हा शरीरात प्लेक जमा होतो तेव्हा, ते रक्तवाहिन्यांना अवरोधित करते. या स्थितीला 'एथेरोस्क्लेरोसिस' असे म्हणतात. शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्याने रक्त वाहिन्यांवर परिणाम होतो. परिणामी स्नायूत वेदना होऊ शकतात. ज्यामुळे हात, पाय, खांदे ते अगदी बोटं सुद्धा दुखू शकतात.

अंग थरथरणे किंवा बधिरपणा येणे : बऱ्याचदा उच्च कोलेस्ट्रॉलच्या रुग्णात अंग थरथरणे आणि बधीरपणाची समस्या येऊ शकते. कारण कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्याने शरीराच्या काही भागात रक्ताभिसरणात अडथळे निर्माण होतात. परिणामी, अंगात थरकाप भरणे आणि काही प्रकरणात बधीरपणा जाणवतो. या परिस्थितीत उच्च कोलेस्ट्रॉल रक्तप्रवाहात रोख आणतो.

नखं पिवळी पडणे : शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली असेल, तर एक महत्वाचे लक्षण जे लगेच दिसून येते, ते म्हणजे नखांचा रंग पिवळा बदलणे. उच्च कोलेस्ट्रॉलमुळे नखांचा रंग बदलून पिवळा होऊ शकतो. हा संकेत शरीरातील खराब रक्त परिसंचरण असल्याचे सांगतो. उच्च कोलेस्ट्रॉलचे हे महत्वाचे लक्षण असून अशा परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**नखांना तडा जाणे :** उच्च कोलेस्ट्रॉलच्या काही प्रकरणात नखांची वाढ थांबते. इतकेच नव्हे तर कोलेस्ट्रॉलची पातळी जसजशी वाढत जाते, तसतसा नखांचा रंग बदलत जातो आणि काही प्रकरणात नखांना तडा देखील जाते. अशावेळी डॉक्टरांकडून तपासणी करून उपचार सुरु करणे गरजेचे आहे.

# तारुण्यासाठी हे आयुर्वेदिक उपाय करा



वय काहीही असो, प्रत्येकाला दीर्घायुषी, टवटवीत आणि चिरतरुण राहायचं असतं. आयुर्वेदात सांगितलेले हे ५ उपाय आपल्या शरीरासाठी अमृतसारखे आहेत. अवश्य वाचा आणि आचरणात आणा.

शुद्ध ऑक्सिजन : चिरतरुण शरीर, प्राणायाम करा, खोल श्वास घ्या, पेशीमध्ये ऊर्जा येते, झपाट्याने म्हातारपण टळतं. प्रत्येक पेशीला ऑक्सिजन दिला की, शरीर झाडासारखं टवटवीत राहतं !

आहार वेळेवर आणि तेल-तूप योग्य प्रमाणात : जेवण वेळेवर हे आयुर्वेदाचं मूळ तत्त्व, केस, डोळे, कान, त्वचेसाठी तेल वापरा, तेल लावून सूर्यनमस्कार शरीरात तेज येतं.

वेळेवर जेवण + तूप + शिस्त + चिरतरुणपणाची गुरुकिल्ली

**दररोज १५ मिनिटं स्वत:साठी ध्यान करा :** सृष्टी माझ्यासाठी आहे हा विचार मनात ठेवा. यामुळे मन शांत, विचार सकारात्मक मन शांत तर शरीरही शांत आणि निरोगी !

# शहापूरचा पॅटर्न जिल्ह्यात राबविणार - जिल्ह्यातील इतर तालुक्यात शिक्षकांना मस्टर ट्रेनर म्हणून पाठविणार

ठाणे, ता. ९ : ठाणे जिल्ह्यातील अतिदुर्गम व आदिवासी बहुल तालुका म्हणून शहापूरकडे पहिले जाते. या तालुक्यातील झेडपी शाळांमधील शिक्षक नाविन्य पूर्णयुक्ती वापरत येथील विद्यार्थ्यांना अज्ञापनाचे धडे देत असतात. त्यातूनच विद्यार्थ्यांच्या बुद्धीमतेते वाढ होवून, स्कॉलरशीप मध्ये घवघवीत यश मिळवीत असतात. त्यामुळे जिल्ह्यातील इतर तालुक्यांचा देखील स्कॉलरशीपचा निकाल वाढवा यासाठी, शहापूर तालुक्याचा पॅटर्न जिल्ह्यातील इतर तालुक्यात राबविण्याचा निर्णय जिल्हा परिषद प्रशासनाने घेतला आहे. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, अंबरनाथ, कल्याण, भिवंडी आणि शहापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १ हजार ३२८ शाळा आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून विविध उपाययोजन करण्यात येत आहे. तसेच खासगी इंग्रजी शाळांच्या स्पर्धेत उतरण्यासाठी अनेक शाळांमध्ये इंग्रजीचे धडे देखील मराठी विषयासह प्रभावीपणे देण्यात येत आहेत. अशातच शहापूर तालुक्यातील शिक्षकांकडून देण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतीमुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्तेव वाढ होवून स्कॉलरशीप स्पर्धेत अव्वल ठरत आहेत. त्यामुळे या तालुक्यातील शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे धडे इतर जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देखील मिळावे, यासाठी शिक्षण विभाग सरसावला आहे. दरम्यान, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकरी रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर तालुक्यातील शिक्षक हे मस्टर ट्रेनर म्हणून जिल्ह्यातील इतर तालुक्यातील शिक्षांकाना प्रशिक्षण देणार आहे. स्कॉलरशीप स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी त्यांच्याकडून दहा ते सात महिने आधी म्हणजेच ४ थी आणि ७ वीच्या स्कॉलरशीप स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येत असते. इयत्ता ३ री आणि ६ वी पासूनचा प्रशिक्षण देण्यात येत असते. त्यानुसार याचे मार्गदर्शन मस्टर ट्रेनर शिक्षकांना देणार आहेत.

# अंबरनाथकरांसाठी महत्त्वाची बातमी!

## महाशिवरात्रीनिमित्त

## 2 दिवस वाहतुकीत मोठे बदल




अंबरनाथ: अंबरनाथमधील शिवमंदिर परिसरात दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या मोठ्या जत्रौत्सवानिमित्त या भागातील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. अंबरनाथ आणि उल्हासनगर शहराच्या वेशीवर असलेल्या या मंदिराच्या परिसरातील सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे बंद असेल. तसेच १४ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान वाहतुकीतील हे बदल लागू असतील, अशी माहिती वाहतूक विभागाने दिली.

**कोणते रस्ते बंद?**

या काळात वाहने वैभव हॉटेलकडून हिंदू स्मशानभूमीपासून सरळ वडवली सेक्शन मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गाने हुतात्मा चौकाकडून मटका चौकातून पुढे जातील. तसेच स्वामी समर्थ चौकाकडून गोविंद तिर्थ पुलामार्गे वैभव हॉटेलकडे जाणाऱ्या तसेच उल्हासनगर कॅम्प पाचमधील कैलास कॉलनीकडून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना स्वामी समर्थ चौक येथे प्रवेश बंद असेल. ती वाहने स्वामी समर्थ चौकातून डाव्या बाजूला वळण घेऊन पुढे रोटरी क्लब वडवली सेक्शन अशी एकतर्फी वाहतूक करून पुढे हिंदू स्मशानभुमी मार्गे वैभव हॉटेलकडे जातील.

अवजड वाहनांना प्रवेश बंद तसेच स्वामी समर्थ चौकातून उजव्या बाजूला वळण घेऊन पुढे कानसई मार्गे सुभाष टेकडी रस्त्याने उल्हासनगरला जातील. वैभव हॉटेलकडून अंबरनाथ रेल्वेस्थानकमार्गे मटका चौकापर्यंत येणाऱ्या सर्व अवजड वाहनांना वैभव हॉटेल येथे प्रवेश बंद असेल. या वाहनांनी आनंदनगर एमआयडीसी टी जंक्शनयेथून फॉरेस्ट नाका, लादीनाका, मटका चौक मार्गे अंबरनाथ पश्चिम येथून पुढे प्रवास करावा. तर औद्योगिक वसाहतीतील कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनांनाही असाच प्रवास करावा लागणार आहे.

मटका चौकातून पूर्वेकडे जाणाऱ्या जड वाहनांनाही फॉरेस्ट नाकामार्गे वैभव हॉटेल जावे लागेल. तर पूर्वेतून येणाऱ्या हलक्या वाहनांना रोटरी क्लब येथे प्रवेश बंद असेल. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून हुतात्मा चौकमार्गे प्रवास करावा लागेल. उल्हासनगरातील वाहने लोकनगरी बसस्थानकाकडून, कैलास कॉलनीकडून येणारी वाहने ओटी सेक्शन, हिललानी पोलीस ठाण्यामार्गे जातील.

# रेल्वेमंत्र्यांकडून महाराष्ट्रासाठी २३,९२६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प

**प्रतिनिधी, मुंबई**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी महाराष्ट्रासाठी व्यापक रेल्वे विकास आराखडा जाहीर केला आहे. यासाठी त्यांनी २३,९२६ कोटींची अर्थसंकल्पीय रुपरेषा जाहीर केली आहे. यात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, मालवाहतूक कनेक्टिव्हिटी आणि राज्यभरात व्यापक आधुनिकीकरण यांचा समावेश आहे.

हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरच्या घोषणेमुळे महाराष्ट्रातील दळणवळण आणखी गतिमान होणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी एकूण २३,९२६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. राज्यात आधीच १.७० लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. ज्यात आता मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद दरम्यान नवीन हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, फ्रेट कॉरिडॉर आणि इतर प्रकल्पांचा समावेश असेल.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव पुढे म्हणाले, हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे मुंबई ते पुणे दरम्यानचा प्रवास वेळ लक्षणीयरित्या कमी होऊन फक्त ४८ मिनिटांवर येईल. त्यामुळे ही दोन शहरे व्यावहारिकदृष्ट्या आणखी जवळ येतील. लोक आपल्या कामांसाठी दोन शहरात सहज प्रवास करू शकतील.

मुंबई-पुणे हायस्पीड रेल्वेच्या मार्गाबद्दल पुण्याचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) राजेश कुमार वर्मा यांनी माहिती दिली. ते म्हणाले, नवीन हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर मुंबईहून लोणावळा, पुणे, दौंड मार्गे सुरू होईल आणि नंतरचा भाग सिंकदराबादला जोडेल.''

पुणे आणि हैदराबाद ही दोन्ही प्रमुख आयटी, इलेक्ट्रॉनिक्स आणि उत्पादन केंद्र आहेत. या दोन शहरांना हायस्पीड कॉरिडॉर, बुलेट ट्रेनचे जाळ्यानी जोडल्यामुळे प्रवाशांना त्याचा मोठा लाभ होईल. यामुळे या दोन शहरातील प्रवासाचा वेळ केवळ एक तास ५५ मिनिटांवर येईल. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या जलद समन्वयामुळे हे शक्य झाल्याचेही रेल्वेमंत्री वैष्णव म्हणाले.

# सूर्यदादाची खेळी, अमेरिकेवर भारी!

## टी-२० विश्वचषकात भारताचा विजयाने प्रारंभ

मुंबई (भास्कर गाणेकर): 'फील द थ्रिल' थीमवर आधारित टी-२० विश्वचषक स्पर्धेची चांगलीच सुरुवात करीत भारताने वानखेडेवर झालेल्या सामन्यात युनाइटेड स्टेट्स ऑफ अमेरिका अर्थात यूएसएचा २९ धावांनी पराभव करीत जेतेपद आपल्याकडेच ठेवण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. पहिली फलंदाजी करताना भारताने केलेल्या १६१ धावांच्या प्रतिउत्तरादाखल यूएसएने १३२ धावांपर्यंतच मजल मारली.

**सिराजला थेट संधी-**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सराव सामन्यात जखमी झालेल्या हर्षित राणाच्या जागी संधी मिळालेल्या मोहम्मद सिराजला विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात संधी मिळाली. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमरा आजारी असल्यामुळे त्याच्या जागी अंतिम अकरामध्ये सिराजची थेट वर्णी लागली. अर्शदिपच्या जोडीला वेगवान गोलंदाजीची धुरा या सामन्यात सिराजने पार पडली.

**पावरप्लेमध्ये भारताची दयनीय अवस्था-**मागील दोन वर्षांपासून टी-२० क्रिकेटमध्ये दबदबा असलेल्या भारतीय संघाला आपल्या पहिल्याच सामन्यात अमेरिका सारख्या दुबळया संघाविरुद्ध तोंडात बोट घातल्यासाखे खेळावे लागले. एखाद्या क्लब क्रिकेट संघाप्रमाणे पावरप्लेमध्ये खेळ झाला. नाणेफेक जिंकून यूएसएने भारताला फलंदाजीस आमंत्रित केल्यानंतर दुसऱ्याच षटकात अभिषेक शर्मा भोपळाही न फोडता माघारी परतला. ईशान किशन व तिलक वर्माने काही प्रमाणात संघाला सावरण्याचा प्रयत्न सुरु केला असतानाच पावरप्लेच्या शेवटच्या षटकात शाडली वॅन शालवीकने भारताची आघाडी भेदत एकामागून एक तीन हादरे देत भारताची अवस्था चार बाद ४६ अशी दयनीय केली. अगोदर किशनला (२०), मग सेट दिसत असलेल्या तिलकला (२५) आणि लगेचच शिवम दुबेला शून्यावर माघारी धाडत भारताची केविलवाणी अवस्था केली.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ५० टक्क्यांहून १८ टक्क्यांपर्यंत भारताचे टॅरिफ कमी केल्याने काहीशी 'रिलॅक्स' मोडमध्ये टीम इंडिया गेलेली दिसली. पावरप्लेमध्ये चार गडी गमावल्यानंतर मधल्या षटकांतही भारताला वानखेडेसारख्या फलंदाजीस पूरक खेळपट्टीवर धावा करायला अवघड गेल्या. पुढील चार षटकांत केवळ ११ धावा देत अमेरिकन संघाने भारताला चांगलेच जखडून ठेवले. एकामागून एक विकेट्स जात असताना भारताचा कर्णधार एक बाजूने किल्ला लढवत होता. १२व्या षटकात अक्षर पटेल माघारी परल्यानंतर आलेला हार्दिक पांड्या आपल्या मुंबई इंडियन्सच्या घरच्या मैदानावर फेल ठरला. ७७ धावांवर भारताने सहावा गडी गमावला, जी असोसिएट संघाविरुद्ध भारताची सर्वात खराब कामगिरी होती.

सूर्यादादाने एका बाजूने किल्ला लढवत ३६ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केल्यानंतर इंनिंग पाचव्या गियरमध्ये एक्सेलरेट केली. त्याने त्याचा एकेकाळीचा सहकारी सौरभ नेत्रावळकरला चांगलेच चोपून काढत भारताला १६० धावांचा पल्ला गाठून दिला. सूर्याने ४९ चेंडूंत दहा चौकार व चार दमदार षटकार खेचत ८४ धावांची नाबाद कप्तानी खेळी केली.




दोन्ही सराव सामन्यांत दोनशेहून अधिक धावा केलेल्या यूएसएने गोलंदाजीत कमाल दाखवल्यानंतर फलंदाजांनी केलेल्या सुमार कामगिरीचा फटका त्यांना बसला. चौथ्याच षटकात तीन गादी माघारी परतल्यानंतर भारताच्या अनुभवी गोलंदाजांसमोर यूएसएचा निभाव लागणार नाही हे स्पष्ट होते. त्यातल्यात्यात मधल्या फळीतील फलंदाजांनी केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर काही प्रमाणात भारताच्या गोलंदाजीचा सामना करीत शेवटच्या षटकापर्यंत प्रेक्षकांना मनोरंजित केले.

पहिल्या तीन फलंदाजांना दुहेरी आकडाही न गाठून देणाऱ्या भारतीय गोलंदाजांची नंतर मात्र दमछाक झाली. चौथ्या गड्यासाठी मिलिंद कुमार व संजय कृष्णामूर्थी यांनी ५२ चेंडूंत ५८ धावांची भागीदारी केली. मिलिंद कुमारला वरूनने चकवत भागीदारी मोडली. किशनने यष्ट्यांच्यामध्ये चलाखी दाखवत हा पराक्रम केला. काही अंतरानेच संजय कृष्णामूर्थीही अक्षरच्या गोलंदाजीवर बाद होत सामना जणू भारताच्या खिशात घातला. अक्षराने पुढच्याच चेंडूवर हरमीत सिंगला बाद करीत आणखी एक हादरा दिला. गोलंदाजी करताना जखमी झालेल्या शुभम रांजणेने थोडासा प्रतिकार करत धावसंख्या वाढीवर भर दिला. त्याने २२ चेंडूंत दोन चौकार व तीन षटकारांसह ३७ धावा केल्या. परंतु त्याच्या या धावा संघासाठी पुरेशा ठरल्या नाही आणि पहिल्याच सामन्यात पराभव स्वीकारावा लागला.

## वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी खेळीने भारताला सहाव्यांदा विश्वविजेतेपद:

## इंग्लंडवर १०० धावांनी दणदणीत विजय

हरारे: क्रिकेटच्या विश्वात पुन्हा एकदा भारतीय युवा शक्तीचा दबदबा पाहायला मिळाला आहे. हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर रंगलेल्या आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडवर १०० धावांनी दणदणीत विजय मिळवून इतिहास रचला. भारताचे हे १९ वर्षांखालील विश्वचषकाचे विक्रमी सहावे विजेतेपद आहे. या विजयाचा शिल्पकार ठरला तो १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी, ज्याने आपल्या आक्रमक आणि विक्रमी शतकी खेळीने अंतिम सामना एकहाती गाजवला.

**ऐतिहासिक विजयाची पार्श्वभूमी-** भारतीय संघाने या स्पर्धेत सुरुवाती पासूनच आपली विजयी घोडदौड कायम राखली होती. अंतिम सामन्यात इंग्लंडसारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यासमोर भारतीय संघाची कामगिरी कशी असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, भारतीय युवा ब्रिगेडने कोणत्याही दबावाला बळी न पडता, आपला नैसर्गिक आणि आक्रमक खेळ करत जगभरातील क्रिकेट प्रेमींची मने जिंकली. या विजयासह भारताने १९ वर्षांखालील क्रिकेटमधील आपली मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

**नाणेफेक आणि भारताचा फलंदाजीचा निर्णय** - अंतिम सामन्याच्या दिवशी हरारेचे हवामान क्रिकेटसाठी अनुकूल होते. भारताचा कर्णधार आयुष म्हात्रे याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा धाडसी निर्णय घेतला. खेळपट्टी फलंदाजीसाठी पोषक वाटत होती आणि मोठ्या धावसंख्येचा डोंगर उभा करून इंग्लंडला दबावाखाली आणण्याची रणनीती भारतीय संघाने आखली होती. हा निर्णय किती योग्य होता, हे पुढील काही तासांतच सिद्ध झाले.

**वैभव सूर्यवंशीचे वादळ: एक अविस्मरणीय खेळी-** भारताच्या डावाची सुरुवात काहीशी अडखळत झाली. उपांत्य फेरीतील शतकवीर एरन जॉर्ज स्वस्तात बाद झाल्याने इंग्लंडच्या गोटात आनंदाचे वातावरण होते. ॲलेक्स ग्रीनने इंग्लंडला पहिले यश मिळवून दिले. मात्र, त्यानंतर जे घडले ते पाहून इंग्लंडचे गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक हतबल झाले.

मैदानावर आगमन झाले ते 'वंडर बॉय' वैभव सूर्यवंशीचे. या १४ वर्षीय डावखुऱ्या फलंदाजाने आपल्या वयाला साजेसा नव्हे, तर एका अनुभवी कसलेल्या फलंदाजाला लाजवेल असा खेळ केला. वैभवने सुरुवातीपासूनच इंग्लंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याचे फटके, टायमिंग आणि आत्मविश्वास पाहून समालोचकही अवाक झाले.

वैभवने अवघ्या ८० चेंडूत १७५ धावांची महाकाय खेळी साकारली. या खेळीत त्याने १५ उत्तुंग षटकार आणि १५ खणखणीत चौकार लगावले. हे १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील आतापर्यंतचे सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. वैभवने केवळ चौकार-षटकारांची आतषबाजीच केली नाही, तर धावफलक सतत हलता ठेवला. त्याने ५५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आणि त्यानंतर ७१ चेंडूत १५० धावांचा टप्पा ओलांडला, जो या वयोगटातील एक विश्वविक्रम ठरला आहे.

त्याचे फटके मैदानाच्या चौफेर बरसले. मिड-विकेट, कव्हर्स आणि लॉंग-ऑफच्या दिशेने त्याने मारलेले षटकार डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. इंग्लंडच्या गोलंदाजांनी यॉर्कर, बाउन्सर आणि स्लोअर वन अशा सर्व अस्त्रांचा वापर केला, पण वैभवसमोर त्यांची कोणतीच डाळ शिजली नाही. जणू काही तो व्हिडिओ गेम खेळत असल्याच्या अविर्भावात फलंदाजी करत होता.

**कर्णधार आणि इतर फलंदाजांची साथ**

एका बाजूने वैभवची फटकेबाजी सुरू असताना, दुसऱ्या बाजूने कर्णधार आयुष म्हात्रेने त्याला योग्य साथ दिली. आयुषने संयमी आणि जबाबदारीने खेळत ५१ चेंडूत ५३ धावांची खेळी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी महत्वपूर्ण भागीदारी रचली, ज्यामुळे भारताचा डाव सावरला आणि नंतर वेग पकडला.

युवा सह्याद्री हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक अरुण आत्माराम माळी यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, ७, उद्योग भवन, शर्मा इंडस्ट्रीयल इस्टेट, वालभट रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३. येथे छापून, प्रसाद आर्ट शॉप नं. एस-२, श्रीकृपा को. ऑं. हौ. सोसायटी, डॉ. आंबेडकर रोड, मुंबई-४०० ०३३ येथून प्रकाशित केले.
संपादक अरुण आत्माराम माळी. Contact: 9821004969 | Email: yuvasahyadri@gmail.com | Web.: www.yuvasahyadri.com